**नियमित दिवाणी दावा क्र.२९५/२०२२**
सुनिता विठ्ठल भिसे
वि.
मुरलीधर रामभाऊ ज–हाड व इतर
MHAH190011012022

**आदेश निशाणी क्र.४९ खाली.**

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.०१ ने प्रतिवादी क्र.०३ हे मयत झाल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रतिदावा अबेट झाला आहे, सदर अबेटमेंट आदेश सेटअसाईड करण्यासाठी सदरचा अर्ज वादींनी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड हे दिनांक २०/०१/२०२५ रोजी मयत मयत झाले. परंतु, प्रतिवादी क्र.०१ आजारी असल्यामुळे त्यांना न्यायालयात येऊन सदर मयत प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झाला आहे. त्यामुळे सदर प्रतिवादी विरुध्द दावा अबेट झाला व सदर अबेटमेंट आदेश सेटअसाईड करण्याची विनंती केली आहे.

३. वादी तर्फे खुलासा मागविण्यात आला. वादी यांनी सदर अर्जास निशाणी क्र.५५ अन्वये म्हणणे दाखल केले. त्यांचे मते सदरचा अर्ज कायदेशिर तरतुदीस अनूसरुन नाही, अर्जातील कारण हे संयुक्तिक नाही. तसेच सदरचा अर्ज मेंटेनेबल नाही व त्यावरुन वादींनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. वादी व प्रतिवादींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध दस्तांची बारकाईने अवलोकन कले. प्रतिवादीने अभिलेखावर प्रतिवादी क्र.०३ चे मृत्यूप्रमाणपत्राची प्रत दाखल केली. त्यानुसार प्रतिवादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड हे दिनांक २०/०१/२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते.

५. वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर मनाई हुकूमासाठी प्रतिवादीं विरुध्द दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.०१ ने निशाणी क्र.२० वर कैफियत व प्रतिदावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड हे मयत झाले असुन अर्जदार प्रतिवादी क्र.०१ हे आजारी असल्यामुळे त्यांनी सदर अर्ज वेळेत दिला नाही. सदरचा अर्ज दिनांक १६/१०/२०२५ रोजी दाखल केला आहे. मुदत कायदा अर्टिकल १२० नुसार वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी नव्वद दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे.

प्रतिवादी क्र.०३ हे दिनांक २०/०१/२०२५ रोजी मयत झाले. परंतु त्यांचे वारस प्रतिवादीने ९० दिवसांत प्रतिदाव्यात रेकॉर्डवर घेतले नाही. त्यामुळे सदरचा प्रतिदावा प्रतिवादी क्र.०३ विरुध्द अबेट झाला आहे.

**६.** प्रतिवादी क्र.०३ महादेव मुरलीधर ज–हाड हे मयत झाले असले तरी त्यांच्या वारसांना वादी विरुध्द प्रतिदावा चालविण्याचा अथवा करण्याचा अधिकार टिकुन आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट प्रतिदावा परिपूर्णपणे व गुणवत्तेवर निकाली निघण्यासाठी वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. तसेच दाव्याची बहुविधता टाळण्यासाठी प्रतिदाव्यात वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. प्रतिवादीचा निशाणी क्र.४९ वरील अर्ज रक्कम रु.२००/– च्या कॉस्टवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादीस कॉस्टची रक्कम द्यावी.

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.03.13 15:51:48 +0530

दि.०९/०३/२०२६

( वैशाली सं. मोरे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ,
शेवगाव.